Time : 2½ Hours

**MARATHI (F.L.)**

**(For Children With Special Needs)**

**Subject Code**

| S | 1 | 1 | 4 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 11)** **Maximum Marks : 80**

***सूचना:—***
(*i*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*iv*) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

प्र. 1. (अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा :

(1) युद्ध नेहमीच ............................ . 1

(अ) भयानक असते.

(ब) अमानवी असते.

(क) अमानुष असते.

(ड) वाईटच असते.

(2) गोपूला आईचे भानच उरले नाही, कारण ............................ . 1

(अ) त्याचे डोके दुखत होते.

(ब) तो भात वेचण्यात गुंतला होता.

(क) तो शेत पाहण्यात रमला होता.

(ड) तो मळ्यातील मौज पाहण्यात गुंतला होता.

(3) लेखिकेने 'निसर्गकन्या' असे ............................ . 1

(अ) बंगाली मुलीला म्हटले आहे.

(ब) पंजाबी मुलीला म्हटले आहे.

(क) आसामी मुलीला म्हटले आहे.

(ड) काश्मिरी मुलीला म्हटले आहे.

(4) गोकूळ स्वभाव ............................ . 1

(अ) विसराळू आहे.

(ब) भांडखोर आहे.

(क) विनोदी आहे.

(ड) चिडचिडा आहे.

(5) दैत्य कुलोत्पन्न राजा प्रल्हाद ............................ . 1

(अ) अत्यंत ज्ञानसंपन्न होता.

(ब) अत्यंत शीलसंपन्न होता.

(क) अत्यंत धर्मसंपन्न होता.

(ड) अत्यंत धैर्यसंपन्न होता.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 5

(1) झाडावर चढणाऱ्या माशाचे नाव काय ?

(2) गावातील गणपती विसर्जनासाठी कुठे नेले जात ?

(3) पाटील कोणत्या गावचे होते ?

(4) पत्रकार व्यक्तीचे नाव कोणते ?

(5) गोव्यात स्वातंत्र्यरूपी सूर्याचा उदय केव्हा झाला ?

(6) छोट्या काश्मिरी मुलीने लेखिकाला भेटीदाखल काय दिले ?

(7) शुक्राने इंद्राला काय दिले ?

(8) पोपटांनी भात कुठे लपविले होते ?

प्र. 2. (अ) खाली 'अ' गटात पाठांची नावे 'ब' गटात त्यांच्या लेखकाची नावे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 4

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (1) खरा वैज्ञानिक कोण ? | (अ) स. मा. गर्गे |
| (2) चोरी | (ब) ह. ना. नार्वेकर |
| (3) राजाचे शील | (क) मधु मंगेश कर्णिक |
| (4) गाडेकार | (ड) जयंत विष्णू नारळीकर |

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **दोन** ते **तीन** वाक्यांत लिहा : 3

(1) गाडेकाराचा दिनक्रम कसा होता ?

(2) समुद्रविंचवाची घरे कशी असतात ?

(3) लेखिकेने गौरीशंकर मंदिर व परिसराची कोणती माहिती दिली आहे ?

प्र. 3. (अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा :

(1) ते जाणतात एक ............................ . 1

(अ) माणूस माणसाला.

(ब) विक्राळ एक ज्वाला

(क) प्रेमास प्रेम द्यावे.

(ड) रक्तास ओढ आहे.

(2) नाचू कीर्तनाचे रंगी ............................ . 1

(अ) तेथे राहू निरंतर

(ब) ज्ञानदीप लावू जगी

(क) वाचे विठ्ठल रखुमाई

(ड) तेचि माझे रूप पूर्ण

(ब) खाली दिलेल्या काव्यांशांच्या योग्य जोड्या लावा : 2

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (1) झाडांनी किती मुकूट घातले | (अ) फिरत गरारा |
| (2) चला रे चक्रांनो | (ब) गुलाल चौफेरी |
| | (क) डोकिस सोनेरी |
| | (ड) गर्जत पुकारा |

(क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द लिहून ओळी पूर्ण करून लिहा :

(1) घुमले ...................... घुमल्या कपारी ! 1

(पहाड, डोंगर, पर्वत)

(2) देहाहूनी निराळी ...................... ओढ आहे. 1

(दुधास, पाण्यास, रक्तास)

(3) गई ...................... गई पुस्तकाची. 1

(पेनाची, कागदाची, वहीची)

(4) पहा ...................... चरोनि होती झाडांवर गोळा. 1

(पाखरे, पक्षी, पशू)

प्र. 4. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 5

(1) कोणाच्या संगतीने लोहाचे सुवर्ण होते ?

(2) तुकारामांनी दैवत असे कोणास म्हटले आहे ?

(3) हयगय केल्यामुळे काय होते ?

(4) ओढा आपल्याबरोबर काय वाहून नेतो असे कवीला वाटते ?

(5) आगगाडी घाटात कशी शिरली ?

(6) एका ध्येयाने प्रेरित होण्यासाठी कवी काय करण्यास सांगतात ?

प्र. 5. (अ) कंसातील सूचनेप्रमाणे लिहा :

(1) आम्ही सहलीला गेलो. 1

(सर्वनाम ओळखून लिहा.)

(2) आई खाली वाकली. 1

(नाम ओळखून लिहा.)

(3) गोपू आनंदाने हसणार. 1

(काळ ओळखून लिहा.)

(4) तो सावकाश उठला. 1

(क्रियापद ओळखून लिहा.)

(5) आंबा गोड आहे. 1

(विशेषण ओळखून लिहा.)

(ब) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा :

(1) संध्याकाळ प्रसन्न आणि स्वच्छ होती. 2

(2) आई त्याच्या तोंडाकडे पाहातच राहिली. 2

(क) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून विशेषण बनवा : 3

जसे, शहर – शहरी

(1) सोने –

(2) नगर –

(3) बहाद्दूर –

(ड) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून भाववाचक नामे बनवा : 3

जसे, सुंदर – सुंदरता

(1) स्वच्छ –

(2) पवित्र –

(3) शांत –

(इ) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांची लिंगे बदलून लिहा : 3

जसे, पुल्लिंग – स्त्रीलिंग

मित्र – मैत्रिण

(1) राजा –

(2) शिक्षक –

(3) कोंबडा –

(ई) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांची अनेकवचनी रूपे लिहा : 3

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| जसे, | पिशवी | पिशव्या |

(1) वही –

(2) आगगाडी –

(3) रस्ता –

प्र. 6. (अ) पुढील 'अ' गटातील शब्दांच्या 'ब' गटातील विरुद्धार्थी शब्दांशी योग्य जोड्या लावा : 3

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) चांगला | (अ) पराजय |
| (2) जय | (ब) दुर्लक्ष |
| (3) लक्ष | (क) वाईट |

(ब) खालील 'अ' गटातील शब्दांच्या 'ब' गटातील समानार्थी शब्दांशी योग्य जोड्या जुळवा : 3

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) पर्ण | (अ) गाव |
| (2) सुषमा | (ब) पान |
| (3) ग्राम | (क) सौंदर्य |

(क) खालील शब्दांचे नामांच्या प्रकारामध्ये वर्गीकरण करा : 4

(सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचक नाम)

गंगा, प्रामाणिकपणा, रामू, पर्वत, गोडी, समुद्र, पणजी, शहर

(ड) खालील वाक्यांतील 'सर्वनामे' ओळखून लिहा : 4

(1) त्याने गोष्ट सांगितली.

(2) मला आज भरपूर अभ्यास आहे.

(3) आम्ही खेळायला जाऊया.

(4) मी पुस्तक वाचते.

(इ) खालील वाक्यांतील 'अव्यये' ओळखून लिहा :

(1) अरे वा! किती सुंदर चित्र ? 1

(2) ढगामागे सूर्य लपला. 1

(3) रामू आणि शामू खेळायला गेले. 1

(4) गाडी वेगाने धावते. 1

प्र. 7. पाठ्यपुस्तकातील पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

गोपू हां हां म्हणता बांधापलीकडील आंबराईपाशी येऊन पोचला. आंब्याच्या झाडावर फांदीफांदीवर, शीळ घालणारी पोपटी पाने. गोपूने बारकाईने त्या झाडाकडे पाहिले. तिथे एक पोपट एका ढोलीतून तोंड बाहेर काढून पाहात होता. अरेच्या, या ढोलीत राहतात काय पोपट ? तिथे तर आपल्याला

सहज चढून जाता येईल. गोपू मागचापुढचा विचार न करता त्या झाडावर चढू लागला. ढोल फार उंचावर नव्हती. गोपू एका दुबेळक्यात बसला नि त्याने ढोलीत वाकून पाहिले. ढील हातभर खोल नि आत भाताची केसरे तोंडापर्यंत ठासून भरली होती. ढोलीतून उडालेला पोपट दूरच्या फांदीवर बसून गोपूकडे वाकड्या मानेने पाहात होता.

**प्रश्न :**

(1) गोपू कुठे येऊन पोचला होता ? 1

(2) गोपूने बारकाईने कुठे पाहिले ? 1

(3) गोपू कुठे बसला होता ? 1

(4) ढोल कशी होती ? 1

(5) पोपट गोपूकडे कसा पाहत होता ? 1

प्र. 8. पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

ऊन, पाऊस, वादळ वारा, बदलते ऋतु, कडाडती वीज या साऱ्या संकटांना हसतमुखाने सामोरे जाणारे झाड परोपकारी संताप्रमाणे असते. झाड थकलेल्यांना आश्रय देते. छाया देते. सुगंधित फुले देते. सुमधुर रसाळ फळं सारे काही देते. पक्षी झाडावर घरटी बांधून गुण्यागोविंदाने राहतात. 'कृतज्ञता' हा गुण झाडांकडूनच शिकावा.

काही झाडांच्या साली व मुळं औषधी असतात. झाडे निसर्गाच्या सौंदर्यात भर घालतात. सृष्टी रमणीय बनवतात. 'देते व्हा' हा संदेश जणू झाडे आपल्याला देत असतात. संकटांना भिऊ नका, डगमगु

नका, आपली जागा सोडू नका, कर्तव्यात कसूर न करता दक्ष रहा, हेच जणू झाडे आपल्या आचरणातून सांगतात.

**प्रश्न :**

(1) झाड कोणत्या संकटाना सामोरे जाते ? 1

(2) झाड कोणाप्रमाणे असते ? 1

(3) झाड कोणाला आश्रय देते ? 1

(4) पक्षी झाडांवर काय बांधतात ? 1

(5) झाडाकडून कोणता गुण शिकावा ? 1

(6) झाडे आपल्याला कोणता संदेश देतात ? 1